# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २१/०९/२०१७

## ***आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती सहल १६ वी फेरी समारोप कार्यक्रम संपन्न***

### *विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेवून स्वतःचा सर्वांगिण विकास साधून आजुबाजूचे जग बदलण्याची क्षमता स्वतःच्या अंगी बाळगून प्रशासनाचा राजदूत बनून सर्व लोकांपर्यंत पोहचण्याचे पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांचे आवाहन.*

गडचिरोली जिल्हा पोलीस व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०७/०९/२०१७ रोजी रवाना झालेली आपला महाराष्ट्र सहलीची १६ वी फेरी पुर्ण करुन दिनांक १९/०९/२०१७ रोजी गडचिरोली येथे परत आले. त्यानिमीत्याने सहलीचा समारोप कार्यक्रम पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे आयोजीत करण्यात आला. सदर कार्यक्रमास मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी सा़ो., व मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत सा़ो. यावेळी उपस्थित होते.

या सहलीमध्ये अतिदुर्गम भागातील एकूण ८६ मुला-मुलींसोबत नक्षलपिडीत तसेच नक्षल पाल्यांचाही सहलीत सहभाग असून पोलीस विभागाच्या अधिकारी-कर्मचारी व वैदयकिय अधिकाऱ्यांचे पथक यांच्यासह एकूण ९८ जणांचा या सहलीत समावेश होता. कार्यक्रमा दरम्यान सहलीला गेलेल्या विदयार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की, महाराष्ट्र दर्शन सहलीने आनंद घेण्याबरोबरच खुप काही शिकायला मिळाले तसेच पहिल्यांदाच रेल्वे, मेट्रो, समुद्र, गेटवे ऑफ इंडिया, सायन्स म्युझियम, गड किल्ले, गार्डन, ऐसेल वर्ड हे सर्व पाहून खुप आनंद झाला असे त्यांनी सांगितले. तसेच काही विद्यार्थ्यांनी मनोगतामध्ये भविष्यात आम्ही पोलीस, डॉक्टर, शिक्षक, वनरक्षक, उद्योजक होवून गडचिरोली जिल्हयास नक्षलवादाची ओळख पुसून आर्थिक, सामाजिक, औद्यागिक, सांस्कृतीक जिल्हा म्हणून उदयास आणण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो. यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, या सहलीचा अनुभव विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याला कलाटणी देईल तसेच या प्रेरणेतून चांगले शिक्षण घेवून स्वत:चा सर्वांगिण विकास साधून आजुबाजूचे जग बदलण्याची क्षमता स्वत:च्या अंगी बाळगून प्रशासनाचा राजदूत बनून सर्व लोकांपर्यंत पोहचावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन मपोउपनि तेजस्वी पाटील यांनी केले.





